गुरुवार, दि. ८ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २७३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## कसोटी क्रिकेटमधून रोहीत शर्मा निवृत्त




**नवी दिल्ली** - भारतीय संघाचा नियमित कर्णधार रोहित शर्मानि कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. हिटमॅन म्हणून ओळखला जाणाऱ्या रोहितने बुधवार ७ मे रोजी सोशल मीडियावर पोस्ट करत कसोटी क्रिकेटला रामराम ठोकला. रोहितच्या निवृत्तीची बातमी अशा वेळी आली जेव्हा निवड समितीने त्याला कसोटी संघाच्या कर्णधारपदावरून काढून टाकण्याचा निर्णय घेणार होती आणि इंग्लंड दौऱ्यावर त्याला संघात स्थान मिळण्याची शक्यताही दिसत नव्हती.

रोहितने इंस्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट शेअर केली. ज्यामध्ये लिहिले की, सर्वंना नमस्कार, मी कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होत आहे, ही गोष्ट मी शेअर करत आहे. कसोटी क्रिकेटमध्ये माझ्या देशाचं नेतृत्त्व करणं हा सन्मान आहे. इतक्या वर्षांच्या प्रेम आणि पाठिंब्यासाठी सर्वांना धन्यवाद. मी भारताचं प्रतिनिधीत्व एकदिवसीय सामन्यांमध्ये करत राहीन. पण, टीम इंडियाचा दिग्गज फलंदाज रोहितने स्पष्ट केले की, तो सध्या एकदिवसीय स्वरूपात खेळत राहील. तो म्हणाला, मी एकदिवसीय स्वरूपात भारताचे प्रतिनिधित्व करत राहीन.

गेल्या काही महिन्यांपासून रोहित शर्माच्या कसोटी क्रिकेटमधील भविष्याबद्दल प्रश्न उपस्थित केले जात होते. विशेषतः त्याचे कर्णधारपद धोक्यात होते. गेल्या वर्षी त्याच्या नेतृत्वाखाली न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर `-३ असा क्लीन स्वीप. त्यानंतर ऑस्ट्रेलिया दौऱ्यात झालेल्या पराभवानंतर रोहितला कर्णधारपदावर राहणे कठीण वाटत होते. पण, रोहितला आशा होती की तो इंग्लंड दौऱ्यावर जाईल आणि संघाचे नेतृत्व करेल. पण मंगळवारी ६ मे रोजी निवड समितीने त्याला कर्णधारपदावरून काढून टाकण्याचा निर्णय घेतला होता, ज्याची माहिती बीसीसीआयलाही देण्यात आली होती.

**रोहित शर्मा कसोटी कारकीर्द** अशा परिस्थितीत, रोहितची संघात निवड होणे अशक्य झाले होते, कारण गेल्या एक वर्षापासून त्याची बॅट या फॉरमॅटमध्ये शांत दिसत होती. अशा परिस्थितीत 'हिटमॅन'ने या फॉरमॅटला अलविदा करण्याची निर्णय घेतला. रोहितने २०१३ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी पदार्पण केले आणि पहिल्याच सामन्यात शतक झळकावले. पण, त्यानंतर पुढील सहा वर्षे तो या फॉरमॅटमध्ये संघर्ष करत राहिला आणि संघात आत बाहेर करत राहिला. तरी रोहित **पान २ वर**

### मध्यरात्री १.०५ वाजता पाकिस्तानात घुसले, १.३० वाजता मिशन पूर्ण

## अतिरेक्यांचे नऊ तळ उद्धवस्त करून ऑपरेशन सिंदूर मोहीम फत्ते

**नवी दिल्ली -** भारतीय सेनेनं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मिरमधील अतिरेक्यांचे नऊ तळ उद्धवस्त करून ऑपरेशन सिंदूर ही मोहीम फत्ते केली. भारतीय हवाई दलानं बुधवार (६ मे) मध्यरात्री दीडच्या सुमारास अतिरेक्यांच्या नऊ ठिकाणांवर यशस्वी स्ट्राईक करून पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला. मध्यरात्री १:०५ वाजता ऑपरेशन सिंदूर सुरू होऊन १:३० वाजता ते यशस्वीरित्या पूर्ण झाले. भारतीय सेनेच्या या खास मोहिमेला ऑपरेशन सिंदूर असं नाव देण्यात आलं होतं. उल्लेखनीय बाब म्हणजे या मोहिमेत भारतीय सेनेनं पाकिस्तानी नागरिक किंवा पाकिस्तानी लष्कराच्या कोणत्याही ठिकाणांवर हल्ला केला नाही. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सेनेनं बहावलपूरमध्ये जैश ए मोहम्मदचं हेडक्वार्टर उद्धवस्त केलं.

भारताकडून कोणत्या ९ ठिकाणांवर एअर स्ट्राईक? १. बहावलपूर - जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय, आंतरराष्ट्रीय सीमेपासून १०० किमी अंतरावर २. मुरीदके - लष्कर-ए-तैयबाचे मुख्यालय, सीमेपासून ३० किमी अंतरावर ३. सवाई - लश्कर-ए-तोयबाचा अड्डा, सीमेपासून ३० कि.मी.दूर ४. गुलपूर - दशतवाद्यांचा अड्डा, ताबारेषेपासून ३५ कि.मी. दूर, हल्ल्यावेळी ८० दहशतवादी ५. बिलाल - जैश-ए-मोहम्मदचं हवाई तळ, सीमेपासून ३५ कि.मी.दूर ६. कोटली नियंत्रण रेषेपासून १५ किमी अंतरावर, ५० दहशतवादी उपस्थित होते. ७. बरनाला - दहशतवाद्यांचा अड्डा, सीमारेषेपासून १० कि.मी.दूर ८. सरजाल जैश-ए-मोहम्मद चा अड्डा, सीमेपासून ८ कि.मी.दूर, ९. महमूना हिजबुल्लाचं प्रशिक्षण केंद्र, सीमेपासून १५ कि.मी. दूर




कोणकोणते दहशतवादी मारले गेले?
लष्कर ए तय्यबाचा महत्वाचा कमांडर खालिद मोहम्मद आलम
धर्मांध इस्लामिक धर्मप्रसारक आणि कोटली दहशतवादी शिबिराचा मुख्य कमांडर कारी मोहम्मद इकबाल
हिजबुल मुजाहिद्दीनचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी मौलाना मसूद अजहर याचा भाऊ आणि भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी रऊफ असगर गंभीररित्या जखमी
मौलाना मसूद अजहर याचा भाऊ आणि भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी रऊफ असगरच्या पत्नीचा मृत्यू.
भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी रऊफ असगरचा मुलगा हुजैफा यांचा मृत्यू.
याशिवाय मौलाना मसूद अजहर याच्या परिवारातील एकूण १४ लोकांचा मृत्यू.
लष्कर ए तय्यबाचे दहशतवादी वकास आणि हसन यांनाही कंठस्नान
लष्कर ए तय्यबाचा मोस्ट वॉन्टेड अब्दुल मलिक आणि मुदस्सिर यांचा खात्मा. **पान ३ वर**

युवा आदर्श

### जय सिंदूर ...

**ऑपरेशन सिंदूर हे**
**पाक वर्मावरी घाव**
**दहशतवादी हल्ला**
**घेणार न आतानाव**
**अस्वस्थ सिमारेखा**
**वाढला युध्द सराव**
**एलओसी पुसतेयं**
**सुटतचालला भराव**
**झुंज देणारं हत्तीशी**
**फुगला बेडूक डराव**
**स्वशक्ती न ओळखे**
**धटिंगणाचे अरेराव**
**भयानक असूरवृत्ती**
**हिंसक कृत्ये घेराव**
**बुरख्यात क्रूर पाक**
**साळसूदता पेहराव**
**कुचाळखोर शेजार**
**चिडला तिर शिंगराव**
**शेजार धर्म विसरला**
**पार हरला अंतर्भाव**
**कुरापती करत राही**
**खुन्नस खोरी स्वभाव**
**आतंकवादी कारवाई**
**सबुरीचे सदैव अभाव**
**आणे संपूर्ण कोंडीत**
**ये आंतरराष्ट्रीय दबाव**
**आयात निर्यात अडवे**
**संसर्ग रोगात प्रादुर्भाव**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## अवकाळीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्या - खा. डॉ. काळे

जालना । प्रतिनिधी - जालना जिल्ह्यात गेल्या दोन-तीन दिवसात झालेल्या अवकाळी पावसासह वादळी वारे, गारपीटमुळे शेतकरी व सर्वसामान्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी खा. डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हधिकारी यांची भेट घेऊन केली आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना जिल्ह्यात दिनांक ०५ मे ते ०७ मे २०२५ दरम्यान अवकाळी पावसासह वादळी वारे,गारपीट आणि विजांच्या गडगडाटामुळे शेतकरी व सामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या नैसर्गिक आपत्तीमुळे पुढील प्रकारचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

**शेतीचे नुकसान -** शेतातील उभ्या रब्बी हंगामातील पिकांचे बियाणाचा कांदा, लसूण, उन्हाळी बाजरी, उन्हाळी मक्का, ज्वारी, भाजीपाला, फुलशेती, पानतांडे यांचे अतोनात नुकसान झाले आहे. तसेच फळपिके आंबा, मोसंबी, द्राक्ष, डाळिंब व इतर फळबागांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके आडवी झाली असून सोंगणीला आलेले पीक वाया गेले आहे. जनावरांच्या चा-याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जनावरांसाठी उभारलेल्या शेडचे पत्रेही उडून गेले आहेत.

**घर व व्यावसायिक मालमत्तेचे नुकसान -** अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांवरील छप्पर व पत्रे उडून गेले आहेत. दुकानांवरील पत्र्यांचे शेड उडून गेल्यामुळे दुकानातील मालसामानाचे नुकसान झाले आहे. तसेच घरातील संसारोपयोगी वस्तूंनाही पावसामुळे हानी पोहोचली आहे.

**वीजपुरवठा खंडित** - वादळामुळे विद्युत पोल पडल्याने व विद्युत तारा तुटल्यामुळे अनेक भागात वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. या सर्व प्रकारच्या नुकसानीमुळे शेतकरी व नागरिक प्रचंड अडचणीत सापडले असून त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे, तातडीने पाहणी करून पंचनामे करण्याची व नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना त्वरित नुकसानभरपाई देण्याची गरज आहे. तसेच, वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी संबंधित विभागामार्फत तातडीची कार्यवाही करण्यात यावी. या गंभीर स्थितीची दखल घेऊन तातडीने योग्य त्या उपाययोजना राबवाल, अशी अपेक्षाही निवेदनाच्याशेवटी व्यक्त केली.



जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ यांना भेटण्यासाठी गेलेल्या डॉ. खा. कल्याण काळे यांच्यासह माजी आमदार कैलास गोरंटयाल, जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, विजय चौधरी, जाफ्राबाद काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, सोपान तिरुखे, गोपाल मोरे, गणेश खरात, दिलीप राठी, राजेश राठोड, ज्ञानदेव इंगोले व इतर शेतकरी उपस्थित होते.

### सैन्य दलाकडून दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त

## जालन्यात काँग्रेसतर्फे आनंदोत्सव साजरा

**जालना । प्रतिनिधी -** पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर जोरदार हल्ला चढवत भारतीय सैन्य दलाने केलेल्या सडेतोड कारवाईचे खा.डॉ.कल्याण काळे आणि माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वाखाली जालन्यात काँग्रेस पक्षातर्फे स्वागत करून फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला.

भारतातील विविध राज्यातून काश्मीर मधील पहेलगाम येथे पर्यटनासाठी आलेल्या निष्पाप २७ पर्यटकांना पाकिस्तानातून आलेल्या काही दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या करण्यात आली होती.या घटनेने देशभरात मोठी खळबळ उडाली आणि निष्पाप पर्यटकांच्या निर्घृणपणे हत्या करणाऱ्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांना कायमस्वरूपी धडा शिकवा अशी मागणी देशभरातील जनतेतून करण्यात आली. केंद्र सरकारने देखील या घटनेची गांभीर्याने दखल घेत कारवाईच्या दिशेने पाऊल उचलले. केंद्र सरकारच्या वतीने करण्यात येणाऱ्या कारवायांना काँग्रेस पक्षाचा पूर्णपणे पाठिंबा राहील अशी ग्वाही काँग्रेस नेते तथा विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिली होती. भारतीय सैन्य दलाने अत्यंत नियोजन पद्धतीने आज बुधवारी पहाटे पाकव्याप्त काश्मीर आणि **पान २ वर**



### पाकिस्तानी अतिरेक्यांवरील कारवाई

## हिंदू समाजाच्या अस्मितेचा निर्णायक प्रतिशोध! - सनातन संस्था

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** भारतीय सैन्यदलाने काल रात्री पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळांवर अत्यंत अचूक आणि निर्णायक एअर स्ट्राइक करून ती सर्व तळे उध्वस्त केली आहेत. ही केवळ एक सैनिकी कारवाई नव्हे, तर देशाच्या अस्मितेचा, सुरक्षिततेचा आणि आत्मगौरवाचा बुलंद शंखनाद आहे, असे प्रतिपादन सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री अभय वर्तक यांनी केले.



ते पुढे म्हणाले की, जम्मू-काश्मीरमधील पहेलगाम येथे २६ निरपराध हिंदू पर्यटकांची जी निर्घृण हत्या करण्यात आली, तो हल्ला केवळ काही व्यक्तींवर नव्हता. तो हल्ला संपूर्ण हिंदू समाजावर होता, भारताच्या संस्कृतीवर होता. या क्रौर्याचा जो बदला भारतीय सैन्याने घेतला आहे, तो प्रत्येक राष्ट्रप्रेमी भारतीयाच्या हृदयाला समाधान देणारा आहे.

सनातन संस्थेच्या वतीने या निर्णायक कारवाईचे आम्ही मन:पूर्वक स्वागत करतो. हे केवळ सूड नव्हे, ही हिंदूंच्या सुरक्षिततेसाठी आणि भारताच्या अखंडतेसाठी घेतलेली धाडसी पावले आहेत.

भारतातील हिंदू आता जागा झालेला आहे. त्यामुळे त्याच्या मागणीची दखल घेऊन सरकारनेही चोख प्रतिउत्तर पाकिस्तानला दिले आहे. आता जर पाकिस्तानने वेगळी **पान २ वर**

# संपादकीय

## घर में घुस के मारा...

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला या भ्याड हल्ल्यानंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली. दहशतवाद्यांनी केलेला हा भ्याड हल्ला पर्यटकांवर नव्हता तर भारताच्या सार्वभौमत्वावर होता त्यामुळे भारत पाकिस्तानच्या या भ्याड हल्ल्यास कधी चोख प्रतिउत्तर देणार ? असा प्रश्न विचारला जात होता. याचे उत्तर बुधवारी मिळाले. बुधवार ७ मे रोजी मध्यरात्री १ वाजून २८ मिनिटांनी भारतीय वायू दलाने पाकव्याप्त काश्मीरवर हवाई हल्ले केले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळावर हल्ले करून दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात शेकडो दहशतवादी ठार झाले आहेत. भारताने केलेल्या या हल्ल्यात किती दहशतवादी ठार झाले याचा आकडा समोर आला नसला तरी या हल्ल्यात १०० पेक्षा अधिक दहशतवादी ठार झाल्याची शक्यता असून यात लष्कर ए तोयबा आणि जैश ए मोहम्मदचे अनेक मोठे दहशतवादी ठार झाले आहेत. भारतीय हवाई दलाने जवळपास २३ मिनिटे हल्ले केले. भारताने केलेल्या हवाई हल्ल्याला ऑपरेशन सिन्दुर असे नाव देण्यात आले. पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्यात ज्या भारतीय महिलांचे कुंकू ( सिन्दुर ) पुसले गेले त्या महिलांच्या सन्म ानार्थ या मोहिमेला लष्कराने ऑपरेशन सिन्दुर असे नाव दिले. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करून भारतीय सैन्याने पहलगाम येथे मरण पावलेल्या २६ पर्यटकांच्या हत्येचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. पाकिस्तानला जशास तसे उत्तर देणाऱ्या भारतीय सैन्याच्या या गौरवपूर्ण कामगिरीने १५० कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. भारतीय सैन्याच्या या कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान असून १५० कोटी भारतीय भारतीय सैन्यदलापुढे नतमस्तक आहे. जो भारताकडे तिरक्या नजरेने पाहिल त्याला भारत घरात घुसून मारेल असा इशाराच भारताने जगाला दिला आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्यांची गय केली जाणार नाही. क्शनला रीक्शन मिळणारच. हा भारत २०२५ चा भारत आहे हे भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. ही मोहीम यशस्वी करून भारतीय सैन्यदलाने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले आहे. अर्थात भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेला हा पहिला हवाई हल्ला नाही. या आधी २०१६ आणि २०१९ साली भारताने असाच हवाई हल्ला करून पाकिस्तानला इशारा दिला होता. मात्र दोनदा हवाई हल्ले झाल्यानंतर देखील पाकिस्तानची खोड मोडली नाही पाकिस्तानने दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करणे चालूच ठेवले त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले. आता तरी पाकिस्तानने शहाणे व्हावे व दहशतवाद्यांना केली जाणारी लष्करी व आर्थिक मदत थांबवावी नाही तर भारत यापेक्षाही मोठी कारवाई करेल. १९७१ साली भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केले जर पाकिस्तानने आपली खोड मोडली नाही तर भविष्यात पाकिस्तानचे चार तुकडे होतील. भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेल्या या हवाई हल्ल्याला पाकिस्तान कसे उत्तर देईल हे पाहावे लागेल. अर्थात या हवाई हल्ल्याला पाकिस्तानने प्रतिउत्तर दिले तर ती पाकिस्तानची सर्वात मोठी चूक ठरेल जर पाकिस्तानने तसे केले तर भारत - पाकिस्तान युद्धाला तोंडच फुटेल. भारत पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले तर पाकिस्तान जगाच्या नकाशावरून गायब होऊ शकतो याचे भान पाकिस्तानने ठेवावे. पाकिस्तानने चीनच्या भरवश्यावर भारताशी दोन हात करू नयेत कारण आजचा भारत हा चीनलाही जशास तसे उत्तर देण्यास सक्षम आहे. चीननेही पाकिस्तानची बाजू लावून धरू नये कारण दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात भारताला अनेक देशांची साथ आहे. अमेरिका, इस्राईल, जपान, रशिया या देशांनी आताच भारताला पूर्ण पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानला जरी तुर्कस्तान, मलेशिया आणि काही इस्लामिक राष्ट्रांनी पाठिंबा दिला असला तरी जगातील सर्व प्रमुख देश भारतच्या बाजूने आहे हे पाकिस्तानने विसरू नये. पाकिस्तानने जर पुन्हा भारताची कुरापत काढली तर त्याची शिक्षा पाकिस्तानला मिळेलच यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करणाऱ्या भारताच्या सैन्यदलाला सॅल्युट! जयहिंद !!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

---

### पान १ वरुन

#### कसोटी क्रिकेटमधून ...

हा कसोटी क्रिकेटमध्ये भारताचा सर्वात यशस्वी फलंदाज बनला, त्याने ६७ कसोटी सामन्यांमध्ये ४०.५७ च्या सरासरीने १२ शतके आणि १८ अर्धशतकांसह ४३०१ धावा केल्या आहेत.

#### जालन्यात कॉंग्रेसतर्फे ...

पाकिस्तानातील दहशतवादी अड्ड्यांवर अचूक हल्ले चढवत नेस्तनाबूत केले. सैन्य दलातर्फे करण्यात आलेल्या या हल्ल्यात अनेक दहशतवाद्यांसह त्यांच्या नातेवाईकांचा खात्मा झाल्याचा दावा केला जात आहे. या यशस्वी कारवाईनंतर जालना लोकसभेचे खासदार डॉ.कल्याण काळे आणि म ाजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वाखाली आज बुधवारी दुपारी जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कॉंग्रेस पक्षाच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करत दहशतवाद विरोधी कारवाईचे स्वागत केले. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारत माता की जय,सैन्य दलाचा विजय असो, पाकिस्तान मुर्दाबाद अशा विविध घोषणा देत जालनेकरांचे लक्ष वेधले. यावेळी विजय चौधरी, राम सावंत, रमेश गौरक्षक, जगदीश भरतीया, विनोद यादव, कपिल भुरेवाल, सदाशिव भुतेकर, गजानन लाड, शेख अनास, योगेश पाटील यांच्यासह कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्त्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

#### हिंदू समाजाच्या ...

आगळीक करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना यापेक्षा अधिक कठोर उत्तर मिळेल, हे भारतीय लष्कर आजच्या कारवाईवरून स्पष्ट होत आहे. 'सनातन राष्ट्र शंखनाद' ही केवळ घोषणा नाही. ती हिंदू समाजावरील अन्याविरुद्धचा हिंदूंच्या एकजुटीचा हुंकार आहे. संपूर्ण हिंदू समाज हा भारतीय सैन्याबरोबर एकजुटीने उभा आहे.

---

# सावधान! 'देख ले पाकिस्तान सिन्दुर मे कितनी ताकद है'

पाकिस्तानने नेहमीच आतंकवाद्यांच्या मदतीने भारतावर छुपे हल्ले करून शांती भंग करण्याचे काम केले व भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे.यावर भारताने सुध्दा अनेक कारवाया करून पाकिस्तानला जशास तसे प्रत्युत्तर सुध्दा दिले.परंतु दिनांक २२ एप्रिल २०२५ ला पहलगाममध्ये पाकिस्तानने आतंकवाद्यांच्या मदतीने २८ निरअपराध पर्यटकांचा बळी घेतला व त्यांचे सिन्दुर पुसण्याचे घृणास्पद काम केले ही सर्वात म ोठी घोडचूक पाकिस्तानने करून भारतीय संस्कृतीवर हात टाकण्याचे काम केले.कारण सिन्दुर काय असते हे पाकिस्तानला माहीतच नाही.परंतु सिन्दुरमध्ये किती ताकद व हुंकार असते ही बाब भारताला,भारतीय संस्कृतीला, भारतीय मुस्लिमांसह संपूर्ण धर्माच्या लोकांना चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्यामुळे सिन्दुरची रक्षा करण्याचे दायित्व भारतीय सेनेने स्विकारले असुन संपूर्ण १४० कोटी जनाता भारतीय जवानांन सोबत उभी आहे आणि जगातील अनेक देशांसह मुख्यत्वे करून मुस्लीम देशांनी सुध्दा भारतीय कारवाईचे स्वागत केले आहे एवढी मोठी ताकद सिन्दुरम ध्ये असते ही बाब पाकिस्तानने लक्षात ठेवली पाहिजे.पहलगाम हल्ला हा सरळ भारतीय संस्कृतीवर हल्ला होता.पहलगाम हल्ल्यामध्ये पाकिस्तानी आतंकवाद्यांनी भारतीय महिलांचे सिन्दुर पुसण्याची सर्वात मोठी चुक केली आहे.भारतीय संस्कृतीत सिन्दुरला किती महत्त्व असते ही बाब ऑपरेशन सिन्दुरने पाकिस्तानला दाखवून दिली आहे.भारताने आतापर्यंत पाकिस्तानी आतंकवाद्यांवर कारवाया केल्यात आणि अनेक आतंकवाद्यांना यम लोक सुध्दा पाठविले.परंतु ऑपरेशन सिन्दुर असा ऑपरेशन आहे की भारत, पाकिस्तानला चिडफार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही आणि त्याला घरात घुसून मारेल तेच काम ऑपरेशन सिन्दुरने केले. चुटकीभर सिन्दुरमध्ये किती ताकद असते ही बाब भारताने पाकिस्तानी आतंकवाद्यांचे ९ कॅम्प उध्वस्त करून दाखवून दिली आहे.भारताची ऑपरेशन सिन्दुर ही कारवाई आरपारची असल्याचे स्पष्ट दिसून येते. ऑपरेश सिन्दुर एअर स्ट्राईक अशा पध्दतीने केला की त्याची कल्पना पाकिस्तान सुध्दा करू शकत नाही. कारण भारतीय सेनेने पाकिस्तानमध्ये असलेले ९ आतंकवादी कॅम्प उध्वस्त करून जगाला एक संदेश दिला की पाकिस्तानने भारतावर जीतक्याही आतंकवाद्यां कारवाया केल्या असेल त्याचा संपूर्ण बदला भारत सरकार ऑपरेशन सिन्दुर मार्फत शेवटच्या क्षणापर्यंत घेईल हे भारताने जगाला दाखवून दिली.आता आतंकवादी कारवायांच्या बाबतीत भारत सरकार सुईच्या टोकाएवढाही समझोता करणार तर नाहीच उलट मदत करणाऱ्यांना सुध्दा सोडणार नाही ही बाब स्पष्ट झाली आहे.भारताने पाकिस्तानच्या १०० किलोमीटर हद्दीत घुसून एअर स्ट्राईक केला यात ९० पेक्षा अधिक आतंकवादी मारल्या गेल्याचे सांगितले जाते. भारत हा जगासाठी शांती दुत आहे आणि त्या पध्दतीने जगासाठी कार्य सुध्दा करीत आहे.परंतु जर कोणी भारताच्या विरूध्द तिरप्या नजरेने जो-जो पाहिल त्याला नेस्तनाबूत केल्या जाईल ही बाब ऑपरेशन सिन्दुरने स्पष्ट करून दाखविली आहे आणि जगाने सुध्दा पाहीली.महत्वाचे म्हणजे या ऑपरेशनमध्ये आतंकवाद्यांचा टॉप कमांडर मसुर अझरच्या १० नातेवाईक मारल्या गेल्याचे सांगितले जाते.त्यामुळे सिन्दुर ऑपरेशनने पाकिस्तानला स्पष्ट संदेश दिला आहे की भारत जितका शांत आहे त्याच्या हजार पटीने अक्राळविक्राळ रूप धारण करू शकते.ऑपरेशन सिन्दुर हा पाकिस्तानसाठी फक्त ट्रेलर आहे आगे आगे होता है क्या ही बाब पाकिस्तानने व जगाने सुध्दा पाहावी.शरमेची गोष्ट म्हणजे काही दिवसांपूर्वी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी काश्मीरचा मुद्दा उपस्थित करून आग ओकण्याचे काम केले होते.यामुळे पाकिस्तानी जनता व तेथील विरोधी पक्षसुध्दा त्यांच्या विरोधात गेले होते.त्यामुळे एवढ्या मोठ्या पदावर विराजमान असीम मुनीर यांनी केव्हा काय बोलावे हे सुध्दा यांना माहीत नाही मग हे कसे काय पाकिस्तानची रक्षा करणार. आज भारताच्या एअर स्ट्राईकमुळे पाकिस्तानी जनता अमीम मुनीर ला व पाकिस्तान सरकारला कोसत आहे. पाकिस्तान अब भी वक्त सुधरजा नहीं तो तेरा अंत निश्चित है.पाकिस्तानला त्याची जागा दाखविण्याकरीता भारत सरकार एअर स्ट्राईक करीत आहेच. परंतु त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी संपूर्ण भारतभर मॉक ड्रिलला सुध्दा सुरूवात झाली आहे म्हणजेच ही पाकिस्तान सोबतची आरपारची लढाई आहे.कारण पाकिस्तानचा पापाचा घडा संपूर्णपणे भरलेला आहे. जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

---

# प्लास्टिकचा वापर टाळा, पर्यावरण समतोल राखा

आपल्याला स्वस्थ आणि निरोगी प्रदूषण मुक्त आयुष्य जगायचे असेल तर आजूबाजूचे पर्यावरण नेहमी स्वच्छ असणे आणि स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा --हास का होतो? ह्याला आपण किती जबाबदार आहोत, निसर्गातील बदल, अनियमितपणा किती कारणीभूत आहे,ह्याचाही विचार करावा लागेलच. खरं म्हणजे, पर्यावरण आणि प्रदूषण ह्याचा खूप जवळचा संबंध. अनेकविध प्रकारच्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा र्हास होत असतो.

मग निसर्ग निर्मित असो वा मानव निर्मित असो,ह्याचा विचार करणे गरजेचे आहे.निसर्ग निर्मित कारणांमुळे होणाऱ्या कारणावर आपण काय करणार? ती एक प्रकारची आपत्तींच असते.पण आपल्या कडून ज्या ज्या कारणांमुळे प्रदूषण निर्मिती होते ती आपण नक्कीच कमी करु शकतो.

पर्यावरणाचा समतोल न राहण्याचे प्रदूषण हेच महत्वाचे कारण कसे आहे हे बघू,आणि आपला सर्वसामान्य माणसाचा त्याच्याशी काय संबंध आहे,आपण काय करु शकतो,काय करत नाही. हे पहाणेही उचित ठरेल.तसेच शासकिय/ प्रशासकीय पातळीवर काय करता येईल, काय होत नाही,हे बघू.

प्रदूषण कोणत्या कोणत्या मार्गाने कसे कसे होते आणि कोणा मुळे होते ते पाहू. वायू प्रदूषण/ हवेतून होणारे. ध्वनि प्रदूषण, जलप्रदूषण, जुनी इलेक्ट्रिक उपकरणे, प्लास्टिक कचरा यामुळे निर्माण होणारे प्रदूषण, वातावरणातील बदलाने, निर्माण होणारे प्रदूषण अर्थातच निसर्ग निर्मित प्रदूषण.अनेक कारखाने आहेत,त्याच्या निर्मिती प्रक्रियेतून वायू, धूर, निर्मिती होत असते.बऱ्याच वेळी हा विषारी वायू आरोग्यासाठी हानिकारक तर असतोच पण त्यामुळे सभोवतालचे वातावरण दूषित होते.वाहनांची संख्या खूप वाढली आहे. जुनी वाहने, वेळीच सर्हिसिंग न होणारी वाहने खूपच धूर सोडतात, त्यामुळेही मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते.आपल्याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे,वाहन तपासणी होते,पोल्युशन प्रमाणपत्र बंधन कारक आहे, पण कुठेतरी ह्या दोन्हीही प्रक्रियेत काहीतरी दोष आहेत.त्यात सुधारणा हवी आहे.एका विशिष्ट मर्यादेपलीकडे निर्माण झालेला असह्य ध्वनी म्हणजे ध्वनिप्रदुषण. कारखान्यातील यंत्रांचे आवाज,वाहनांचे कर्कश्य हॉर्न,सायलेन्सर विना चालणाऱ्या गाड्या, वाहने,मर्यादा पलिकडे डेसिबलने वाजणारे डी. जे.हे कारणीभूत ठरतात. व त्यामुळे अस्वस्थता, चिडचिड, निर्माण होते.कारखान्यातील निर्मिती प्रक्रियेतून निर्माण होणारे रसायने मिश्रित दूषित पाणी,नद्या,नाले,तलावात सोडले जाते,ते आजूबाजूच्या परिसराला त्रासदायक ठरते. आजूबाजूला पाण्याचे स्त्रोत असतील ते दूषित होतात, ते पाणी पिऊन मोठ्याप्रमाणात जनावरे मृत्यूमुखी पडतात.बऱ्याच मोठ्या शहरात सांडपाण्याची विल्हेवाट व्यवस्थित नसते,ते एक कारण आहेच.

प्लास्टिकचा कचरा, जुनी इलेक्ट्रिक उपकरणे फेकून दिली जातात,ते नष्ट होत नसतात,प्लास्टिक पिशव्या वापराबंदी येऊनही सर्रास वापर सुरू आहे.आपल्याला तर ते घातक आहे,तसा जनावरांनाही,तो खाऊनही हज्जारो जनावरे मृत्यमुखी पडतात.पशुधन



नष्ट होते.रस्त्याच्या दुतर्फा पडलेले कचऱ्याचे ढीग आपण पहातोच.निसर्गातील अर्थातच वातावरणातील बदलाचा पर्यावरणाचा समतोल ढासळण्यावर मोठा परिणाम होतो. बघा,निसर्ग वादळ पावसाने हज्जारो वृक्ष कोलमडून, उन्म ळून पडतात. आपण शहराचे सुशोभनासाठी, वाहतूक मार्गासाठीही अशीच हज्जारो वृक्षांची कत्तल करतो.एकीकडे वृक्षारोपण कार्यक्रम राबवतो..खूप वर्षाची वाढलेले वृक्ष नष्ट झाल्याने पर्यावरणाचा समतोल ढळतो. आक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे.प्रत्यकाने एक वृक्ष लावण्याचा, जगवण्याचा संकल्प करायला हवा. सरकारी वृक्षारोपण कार्यक्रमात पारदर्शकता हवी.नाहीतर त्याच त्या जागी दरवर्षी वृक्षारोपण केल्याच्या बातम्या आपण वाचतो.

पर्यावरणाचा समतोल ढासळण्याची काही मानव निर्मित,तर काही निसर्ग निर्मित कारणे आहेत.

मानव निर्मित कारणांनी प्रदूषण वाढून पर्यावरणाचा समतोल ढळत आहे,ती आपली सगळ्यांची जबाबदारी आहे.त्याला आपणच पायबंद घालायला हवा.प्रत्येकाने मनावर घेतले तर सहज शक्य आहे.पण तेच होत नाही. अनेक अभियान राबवली जात आहे,जसे प्लास्टिक पिशवी मुक्ती अभियान, स्वच्छता अभियान, अथिक कडकपणे राबवायला हवे. अजून बाजारपेठेत पिशव्या सापडतात,रस्त्यावर थुंकणारांचे प्रमाणात कमी होत नाही.

अनेक पर्यटन स्थळे, देवस्थान, धार्मिक ठिकाणे, हॉस्पिटल हे सुद्धा प्रदूषण निर्माण होण्यास कारणीभूत ठरतात अशा ठिकाणी स्वच्छता राखणे हे प्रसिद्ध बघायला हवे.

प्रदूषण नियंत्रण महामंडळ, गावोगावच्या ग्रामपंचायती,नगरपालिका, महानगरपालिका, यांनी,तसेच अभियानांची जबाबदारी ज्यांचेबर दिली आहे,त्यांनी आपले कर्तव्य, जबाबदारी आत्मियतेने पार पाडली तर हे सहज शक्य आहे.वेळप्रसंगी दंडात्मक कारवाई करायलाच हवी.ती कोणी करावी हे नक्की करायला हवे. त्यात तू तू मै मै नको.

प्रदूषण वाढत आहे याला महत्त्वाचे कारण म्हणजे प्लास्टिकचा दैनंदिन जीवनात बेसुमार वापर. प्रत्येक ठिकाणी प्लास्टिकचा वापर केला जातो. त्याचे दुष्परिणाम माहिती असूनहीत्याच्यावर बंदी आणूनही छुप्या मार्गाने प्लास्टिक वापर मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. आताचा प्लॅस्टिकच्या संशोधकांनी मानवी रक्तात देखील प्लास्टीकचे कण सापडल्याचे म्हटले आहे. त्यावर संशोधन सुरू आहे. अम रस्टरडॅम येथील यूनिवर्सिटी आणि अमरस्टरडॅम मेडिकल सेंटरच्या संशोधकांनी २२ लोकांच्या रक्ताची तपासणी केली त्यात २२ पैकी १७ लोकांच्या रक्तात प्लास्टिककण होते म्हणजेच ८० टक्के लोकांच्या रक्तात मायक्रो प्लास्टिक आढळले एन्व्हायरमेंट इंटरनॅशनल जनरल मध्ये याविषयी माहिती देण्यात आली आहे.

दैनंदिन जीवनात आपण भाजीपाला, किराणा वस्तू, दूध, कपडा, कुल्फी आईस्क्रीम गाडीवर, पुस्तकाचे दुकानात ,प्रवासात प्लास्टिक पिशव्यांचा वापर अगदी सहजपणे करत असतो. मग त्या पिशव्यांची जाडी किती मायक्रोन ची आहे हे पाहायला कोणालाही वेळ नसतो कारण जीवन गतिमान झाले आहे. तसेच फ्रिज मधल्या बाटल्या. प्रवासात आपण घेतो त्या पाण्याचे बॉटल्स हे सर्व वापरतो आणि त्यानंतर ते अगदी सहजपणे कचऱ्यात टाकतो. या कचऱ्यापासून विषारी वायू निर्माण होतोच पण अन्ना बरोबरच त्या पिशव्याही जनावरे खातात आणि दरवर्षी हजारो ने पशुधन नष्ट होते. देवस्थान ,पर्यटन स्थळे, मोठमोठे हॉस्पिटल्स,यास कारणीभूत ठरतात. अनेक प्रकारच्या प्लास्टीकचे वस्तूंचे विघटने होत नसते. त्यामुळे आपण मोठ्या शहरात बघतो शहराच्या बाहेर जे कचरा डेपो असतात तिथे प्रचंड प्रमाणात प्लास्टिकच्या वस्तूंचा खच पडला असतो. तसेच बऱ्याच वेळा पाण्याचे स्त्रोत असतात त्या ठिकाणी या वस्तू टाकल्या जातात आणि ते पाणी दूषित होते आणि प्रदूषण होते.आपल्या देशामध्ये फार म ोठ्या प्रमाणावर प्लास्टिक निर्मिती होत आहे. हजारो युनिटमध्ये लाखो लोकांचा रोजगार असतो आणि त्यामुळेच या गोष्टीकडे दुर्लक्ष होते असेही म्हणावे लागेल. आता तर सिंगल प्लास्टिक वापरास बंदी करण्यात आली आहे. प्लास्टिकचे कप, ग्लास, प्लास्टिकचे चमचे, केक कापण्यासाठी वापरात येणारी सूरी, चॉकलेट आईस्क्रीम साठी वापरण्यात येणाऱ्या कांड्या ,सजावटीसाठी वापरण्यात येणारे पॉलीस्ट्रीन, मिठाई साठी वापरण्यात प्लास्टिकचे डबे, ७५ मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या याचा सर्व वस्तूंचा समावेश आहे. अशा वस्तूंवर बंदी आली असती तरी बऱ्याच प्रमाणात दुर्लक्ष आहे. तेव्हा प्रत्येकाने आपली जबाबदारी म्हणून अशा या घातक प्रदूषणाकडे लक्ष देऊन प्लास्टिकचा वापर बंद करणे आवश्यक आहे शासनाची जेवढी जबाबदारी आहे तेवढीच आपली ही आहे. आपल्या बेजारपणामुळेच हे प्रदूषण वाढणार आहे. बऱ्याच ठिकाणी प्लास्टिक कचरा विघटनाच्या यंत्रणा उभारण्यात आलेली आहे परंतु ती पुरेशी नाही. त्यात योग्य प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमातून स्वयंसेवी संस्थांकडून शिक्षण संस्थातून याचा प्रसार व्हायला हवा आहे. तसेच प्लॅस्टिकच्या वापरावर कडक बंदी आणायला हवी आहे .

प्लास्टिक पासून होणारे प्रदूषण टाळणे आणि पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मो.नं.८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

---

# ऑपरेशन सिंदूर यशस्वी... अभिनंदन!

पाकिस्तान हा भारताने फ ेकलेल्या तुकड्यावर जगणारा देश आहे.आपण इमानी कुत्र्याप्रमाणे मिळाले त्यात सम ाधान मानून आपली राजकीय सामाजिक प्रगती करावी असा विचार केला असता तर भारताने मोठ्या भावाची भूमिका निभावली असती पण पाकिस्तानीची अक्कल गुडघ्यातच आहे. .देशाची फाळणी झाली,इंदिरा गांधी यांनी नंतर दोन तुकडे करून बांगला देश निर्माण केला.हा सारा इतिहास डोळ्यासमोर घडून सुद्धा कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच.भारतापुढे आपला निभाव लागणार नाही.भारत आपल्यापेक्षा चौपटीने सशक्त आहे ह्याची जाणीव असूनसुद्धा भारतविरोधी कुरापती सुरूच आहेत.पहलगाम येथे प्रथमच पाकिस्तानी अतिरेक्यांनी निष्पाप भारतीय नागरिकांची हत्या करून भांगेतल्या सिंदूरला रक्ताचा आहेर भेट केला हे अखंड जगाचे मन उद्विग्न करणारे होते.ऑपरेशन सिंदूर हे समपर्क नाव देऊन तुम एक मारोगे तो हम दस मारेंगे हेच ह्या यशस्वी हल्ल्याने सिद्ध केले.महत्वाचे म्हणजे लष्कराचा हवाई अड्डा उध्वस्त केला,मसूद अझहर,हाफिज सईद,सलालुद्दीन ह्या तीन अतिरेक्यांचे सहित नऊ दहशदवादी तालावर हल्ला करून उध्वस्त केले.जैश ए मोहम्मद चे १०० दहशदवादी ठार केले निवृत्त जहाँबाज अधिकारी नरवणे साहेब यांनी पिक्चर अभी बाकी है असे उद्गार काढले ह्याचा अर्थ आपण पाकिस्तानचे फक्त हात पाय तोडले कंबर अजून ठेंचून काढायची बाकी आहे असा त्याचा अर्थ होतो तर मसूद,हाफिज,सलालुद्दीन ह्यांचा खात्मा बरोबर दाऊद




चा खात्मा,पाकिस्तानी हवाई अड्डा उध्वस्त,महत्वाचे रेल्वे व महामार्गावरील मोठे ब्रिज उध्वस्त करणे एक हजार म दरश्यामध्ये होणारे देशविरोधी कारवाया पाहता ते उध्वस्त करणे,पाकिस्तानी सेनेचा खात्मा करणे,बलुचिस्तान वेगळे करणे.पाकिस्तानचे अति आता झाले आता पूर्ण खात्मा झाल्याशिवाय माघार नाही.एक चुटकीभर सिंदूर कि किंमत तू क्या जानो पाकिस्तानी हरामजादो हमारे जवान भाईयोने आपको मुहतोड नही पाकिस्तान का पुरा ढाचा ढिलाकरके जवाब दिया. ऑपरेशन सिंदूर मोदींनी नाव दिले ते यशस्वी झाले त्यांचे संपूर्ण भारतवासीयांनी आभार मानले पाहिजेत.पहलगामच्या हल्याचा प्रतिशोध पाकिस्तान नेस्तनाबुत झाल्याशिवाय ऑपरेशन सिंदूर पूर्ण होणार नाहीं.सदर घटनेला सर्व राजकीय पक्षांनी जो एकंपो दाखवला त्याबद्दल त्यांचे अभ्हार मानले पाहिजे,तसेच कोणीही श्रेयाचे राजकारण करून वातावरण दूषित करू नये.ऑपरेशन सिंदुरच्या सर्व यशस्वी तिन्ही दलाचे मनपूर्वक अभिमानदं अभिनंदन...

**यशवंत चव्हाण सीबीडी**
**बेलापूर**

# अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा टिप्पर मौजपुरी पोलिसांनी पकडला




**जालना । प्रतिनिधी -** अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा टिप्पर जालन्याच्या मौजपुरी पोलिसांनी पकडलाय. मौजपुरी पोलीस ठाणे हद्दीतील मानेगाव ते खोडेपुरी रस्त्यावर ही कारवाई करण्यात आलीय. मानेगाव ते खोडेपुरी रस्त्यावरून अवैधरित्या वाळू वाहतूक होत असल्याची माहिती मौजपुरी पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीवरून पोलिसांनी कारवाई करून अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा एका विना नंबरचा टिप्पर पोलिसांनी काल दिनांक चार रविवार रोजी जप्त केलाय. या प्रकरणी टिप्पर चालक अरुण गायके यास पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध मौजपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलाय. या कारवाईत पोलिसांनी एकूण ८ लाख १८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# राज्यस्तरीय सिलंबम स्पर्धेत जालन्यातील मुलांची उत्तम कामगिरी

**पुणे । प्रतिनिधी -** येथील पिंप्री चिंचवड येथे झालेल्या खुल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय सिलंबम स्पर्धा २०२५ मध्ये राज्यातील २६ जिल्ह्यातील स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत जालन्यातील मुलांनी उत्तम कामगिरी करत द्वितीय पारितोषिक पटकावले आहे.

राज्यस्तरीय सिलंबम स्पर्धेत नवदुर्गा मर्दानी खेळ आखाडा जालनाच्या मुलांनी उत्तम कामगिरी करत जालना जिल्ह्याला द्वितीय पारितोषिक पटकावून दिले. वैयक्तिक खेळा मध्ये कुकृतिका भुरेवाल स्टिक फाइट (लाठी युद्ध) गोल्ड मेडल, लाठी फिरविने सिल्वर मेडल, प्रिशा परमवीर शंकरपेल्ली सिल्वर मेडल, स्टिक फाइट ब्रांज मैडल, श्रीशा परमवीर शंकरपेल्ली सिल्वर मेडल, स्टिक फाइट ब्रांज मैडल, जानव्ही काकड़े लाठी फिरविने सिल्वर मेडल, स्टिक फाइट सिल्वर मेडल, शिवांश किरण झारखण्डे ब्रांज मेडल स्टिक फाइट, लाठी फिरविने सिल्वर मेडल, रुद्राक्ष भूषण यादव लाठी फिरविने सिल्वर मेडल, तलवार फिरविने सिल्वर मेडल पारितोषिके पटकावली आहेत. सांघिक




खेळात जालन्यातील मुलांनी द्वितीय स्थान पटकावून राज्यातील उपस्थित संघात आपली विशिष्ट ओळख निर्माण केली. जालन्यातील मुलांनी अल्पवधीतील सरावावरच या स्पर्धेत मोठी कामगिरी केली आहे.

या मुलांना प्रशिक्षक भूषण हरेश यादव यांचे मार्गदर्शन लाभले. तर प्रा नितिन भक्त, प्रतीक्षा दब्बडवार, मनीषा भुरेवाल यानी परिश्रम घेतले. स्पर्धेतील यशानंतर मुलांचे राज्यभरात कौतूक होत आहे.

## वाचकांचे मनोगत

## मंदिरे हिंदूंच्या ताब्यात द्यायला हवी !

अलीकडे शेतकऱ्यांची आत्महत्या ही गंभीर समस्या भारतामध्ये, मुख्यत्वे करून महाराष्ट्रामध्ये काळजीत टाकणारी आहे. यावर, मंदिरांच्या पैशातून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशा उपाययोजना जोर धरत आहेत. सरकारच्या ताब्यात असलेली काही मंदिरे यावर पाऊले उचलताना दिसत आहेत. आत्तापर्यंत शेतकऱ्यांना मदत म्हणून सरकार पुष्कळ योजना राबवत आहे. पण या योजनांचा शेतकऱ्यांना खरोखर फायदा होत आहे का? या योजना खालपर्यंत म्हणजेच प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचत आहेत का? याविषयीची सत्यता सर्वज्ञात आहे. सर्वच क्षेत्रांमध्ये भ्रष्टाचार फोफावलेला आहे. नुकताच, हिंदू जनजागृती समितीने काही मंदिरांच्या जमिनीचा आर्थिक घोटाळा उघडकीस आणला आहे. श्रद्धाळू हिंदू केवळ श्रद्धेपोटी, भगवंताच्या प्रेमापोटी मंदिरात दान देतात. हिंदूंची मंदिरे सुद्धा इतर धर्मस्थानांप्रमाणेच सरकारच्या ताब्यात न राहता हिंदूंच्याच ताब्यात राहावीत, हिंदूंच्या मंदिरांवर आणि पैशांवर केवळ हिंदूंचेच नियंत्रण राहावे, या मंदिरांचा पैसा केवळ हिंदूंसाठी आणि हिंदू धर्माच्या पुनरुत्थानासाठी वापरला जावा.

**अक्षता चौधरी, परभणी**

## डॉ. प्रशांत तेलगड यांना डॉ पंजाबराव देशमुख कृषी रत्न राज्यस्तरीय पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी -** जालनाचे डॉ. प्रशांत सोपानराव तेलगड यांचे सेंद्रिय शेती माध्यमातून अल्प भूधारक शेतकरया साठी कार्य करत आहेत. व तसेच त्यांचे कृषी क्षेत्रामध्ये त्यांच्या कार्यची नोंद घेऊन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने एकविसाव्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन ९ व १० मे २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात कराड येथे आयोजित केलेले आहे. लोकनेते मा. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार असून त्यांच्या हस्ते डॉ पंजाबराव देशमुख कृषी रत्न राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येणार आहे तरी मोठ्या संख्येने साहित्यिक व विचारवंत



या संमेलनास उपस्थित राहणार आहे सदर पुरस्कार जालनाचे डॉ. प्रशांत सोपानराव तेलगड यांना डॉ पंजाबराव देशमुख कृषी रत्न राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्या बद्दल यांचे हार्दिक अभिनंदन व सर्वच स्तरातून त्यांचे सर्व स्तर तून अभिनंदन करण्यात येते आहे.

## हज यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी लसीकरण शिबिर संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** हज यात्रेला मुस्लिम समाजात महत्त्वाचे स्थान आहे. आयुष्यात एकदा हज यात्रा करणे मुस्लिम धर्मीयाला बंधनकारक आहे. यावर्षी जालण्यातून ३२८ हाजी बांधव हज यात्रेला रवाना होणार आहे. तर या यात्रेला जाणाऱ्या बांधवांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या लसीकरण शिबिरात सर्वच हाजी बांधवांनी आपले लसीकरण करून घेतले. जिल्हा शल्यचिकित्सक राजेंद्र पाटील व महाराष्ट्र राज्य हज कमिटी सदस्य हाजी फिरोज लाला तांबोळी यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन



करण्यात आले. यावेळी हाजी बांधवांसाठी विशेष सोय करण्यात आली होती. हज कमिटी व खादीम हुज्जाज हज कमिटी यांच्यावतीने या लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. तर यावेळी वसीम तांबोळी,शेख शकील व शेख विखार यांच्यासह कमिटीचे सदस्य उपस्थित होते. देशाच्या एकते व अखंडतेसाठी हाजी बांधवांनी प्रार्थना करावी अशी या वेळी त्यांना विनंती करण्यात आली.

पान १ वरुन

## अतिरेक्यांचे नऊ ...

**'ऑपरेशन सिंदूर'ची वैशिष्ट्ये-**

१. पाकिस्तानच्या रडार यंत्रणेला कळू न देता हल्ला, २. भारतानं दहशतवादी अड्डे उद्धवस्त केल्याची पाकची कबुली, ३. पाकव्याप्तच नव्हे पाकिस्तानातले अड्डेही उद्धवस्त, ४. दहशतवादी अड्ड्यांची माहिती अचूक होती हे सिद्ध, ५. ९ तळांवरील हल्ल्यात शेकडो दहशतवाद्यांचा खात्मा, ६. भारतीय हवाई हल्ल्यांत एकाही नागरिकाला इजासुद्धा नाही, ७. आंतरराष्ट्रीय सीमा रेषा ओलांडून भारताचे हल्ले

**राफेल विमानांनी लक्ष्यांवर डागली स्काल्प क्षेपणास्त्र**

पाकिस्तानची ९ लक्ष्य बेचिराख करण्यासाठी राफेल विमानांचा वापर, राफेल विमानांनी लक्ष्यांवर डागली स्काल्प क्षेपणास्त्र, अतिदूरच्या लक्ष्यांवर मारा करण्यासाठी स्काल्प क्षेपणास्त्र, ५०० किमी अंतरावरील लक्ष्यांचा मारा करण्याची स्काल्पची क्षमता, १ हजार किमी प्रतितास वेगाने स्काल्प मिसाईल करतं मारा, शत्रूच्या रडारवर स्काल्प दिसत नसल्याने हल्ला यशस्वी

**भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरची एक-एक बाब**

पाकिस्तानात १०० किमी आत घुसून नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केला, अशी माहिती भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरनंतर दिली. अवघ्या २३ मिनिटांत भारतीय सैन्यदलांकडून ऑपरेशन सिंदूर फत्ते करण्यात आले. पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरबाबत भारतीय सैन्याने दिलेल्या पत्रकार परिषदेत दोन महिला अधिकाऱ्यांचाही समावेश होता. भारतीय लष्कराकडून कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ऑपरेशन सिंदूरची सगळी माहिती दिली. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा पुराव्यांसह बुरखा फाडला. लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी या मोहिमेबाबत माहिती देताना सांगितलं की, भारतीय लष्कराच्या अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या की, २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले होते. या कारवाईत ९ दहशतवाद्यांचे अड्डे लक्ष्य करून नष्ट करण्यात आले. ऑपरेशन सिंदूर दरम्यान, निष्पाप नागरिकांना इजा होणार नाही याची काळजी घेण्यात आली. मार्च २०२५ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील चार जवानांची हत्या करण्यात आली होती. मुंबई दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. मरकज सुभानल्लाह हे जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय होते. येथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जात असे. कोणत्याही लष्करी ठिकाणाला लक्ष्य करण्यात आले नाही आणि नागरिकांची जीवितहानी झाली नाही, अशी माहिती लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली आहे. यावेळी त्यांनी टार्गेट असलेली आणि ती ठिकाणे उद्ध्वस्त झाल्याचे फोटो देखील दाखवले.

संरक्षण मंत्रालयानं म्हटलं की आमची कारवाई केंद्रीत,स्पष्ट आणि कोणताही वाद निर्माण करण्यापासून वाचलेली आहे. आम्ही कोणत्याही पाकिस्तानी सैन्य ठिकाणांवर हल्ला केलेला नाही. भारतानं ठिकाणांची निवड करण्यात आणि ते उद्धवस्त करण्यात खूप संयम दाखवला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात भारतीय २५ आणि एका नेपाळी नागरिकांची हत्या करण्यात आली होती. संरक्षण मंत्रालयाच्या वक्तव्यानुसार आम्ही आमची कटिबद्धता निश्चित केली आहे.पहलगाम दहशतवादी हल्ल्यास जबाबदार असलेल्यांना उत्तर दिलं जाईळ. ऑपरेशन सिंदूर संदर्भातील माहिती नंतर देऊ, असंही संरक्षण मंत्रालयानं म्हटलं.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून, भारताच्या लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संयुक्तपणे पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्यांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. भारताने आपल्या हद्दीत राहून हा हवाई हल्ला केल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. तथापि, हा हवाई हल्ला पाकिस्तानच्या सुमारे १०० किमी आत करण्यात आला. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः ापरेशन मॉनिटर करत होते. ९ टार्गेट ठेवण्यात आले होते. ९ च्या ९ टार्गेट यशस्वी झाले आहेत.

ऑपरेशन सिंदूरच्या या एअरस्ट्राइकमध्ये कुख्यात दहशतवादी मसूर अझहरच्या कुटुंबातील १४ जणांचा खात्मा झाला. इतरही अनेक दहशतवादी या एअर स्ट्राइकमध्ये मारले गेले आहेत. यात मसुद अजहरचा भाऊ रऊफ अजगर हा गंभीर जखमी असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मुंबईत झालेल्या २६/ ११ च्या हल्ल्याचा सूत्रधार मसूद अजहर असल्याचं सांगितलं जातं. त्यानंतर मसूद अजहरचा अनेक मोठ्या दहशतवादी कारवायांमध्ये सहभाग होता. मसूद अझहरने आजवर भारताविरुद्ध अनेक वेळा मोठे कट रचले आहेत. मौलाना मसूद अझहर हा पाकिस्तानमध्ये वाढलेल्या जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा प्रमुख आहे. २००१ मध्ये संसदेवरील हल्ल्याचा कट त्यानेच रचला होता. यासह उरी हल्ल्यातही मसूद अझहर हाच सूत्रधार होता. गेल्या वर्षी जानेवारीमध्ये पठाणकोट येथील लष्कराच्या तळावरील हल्ल्यातही त्यांनी भूमिका बजावली होती.

सर्वाधिक दहशतवाद्यांची उपस्थिती असलेले तळ बेचिराख

बहावलपूरमध्ये २५० हून अधिक दहशतवादी, मुरिदकेमध्ये १२० हून अधिक दहशतवादी, मुजफ्फराबादमध्ये ११० ते १३० दहशतवादी, कोटलीमध्ये ७५ ते ८० दहशतवादी, सियालकोटमध्ये ९० ते १०० दहशतवादी, गुलपूरमध्ये ७५ ते ८० दहशतवादी, भिंबरमध्ये ६० हून अधिक दहशतवादी, चाक अम्रूमध्ये ७० ते ८० दहशतवादी

**ऑपरेशन सिंदूर नाव का?**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भरतीयांसह जगभरात संतापाची लाट पसरली होती. या दहशवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकांचा मृत्यू झाला होता. मात्र या भ्याड हल्ल्यातील सर्वात भयावह गोष्ट म्हणजे दहशतवाद्यांनी सामान्य पर्यटकांना लक्ष केलं. सोबतच पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळी झाडली आहे. या कृत्यानं नक्कीच एक गोष्ट अधोरेखित केली जात आहे ती म्हणजे हा हल्ला केवळ देशावर नाही तर त्यामागे धार्मिक आणि देशाच्या एकात्मतेवर ही हल्ला असल्याचे बोलले जात आहे. या भ्याड हल्ल्यावेळी महिलांचं कुंकू म्हणजे त्यांच्या पतींना लक्ष करण्यात आलं. दहशतवाद्यांचा हेतू केवळ त्यांना जिवानिशी मारण्याचाच नव्हता, तर भारतीय संस्कृती, देशातील एकता आणि देशाच्या आत्म्यावर हल्ला करण्याचा होता. त्यामुळे अनेक निष्पापांचे कुंकू पुसल्या गेलेल्या पीडित कुटुंबियांना काही अंशी न्याय देण्याच्या हेतूने या मोहिमेला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

**पाकिस्तानकडून बदला घेण्याच्या वल्गना**

पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याला भारताने दिलेला प्रतिसाद 'तात्पुरता आनंद' असल्याची प्रतिक्रिया लेफ्टिनेंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी दिली आहे. त्यात ते पुढे म्हणाले की 'याचा बदला कायमस्वरूपाच्या दुःखाने घेतला जाईल.'ISPR च्या अधिकृत निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, 'पाकिस्तान स्वतःच्या वेळेनुसार आणि ठरवलेल्या ठिकाणी या हल्ल्याला प्रत्युत्तर देईल' आणि भारताच्या हल्ल्याचा संदर्भ देत ते पुढे म्हणाले की, या हल्ल्याला 'अनुत्तरीत सोडले जाणार नाही'.'भारताने तीन ठिकाणी हवाई हल्ले केले आहेत. बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबाद... पाकिस्तानी हवाई दलाची सर्व विमाने हवाई हल्ले करत आहेत. सर्व हल्ले भारताने स्वतःच्या हवाई हद्दीतून केले आहेत,' असे आयएसपीआरच्या निवेदनात पुढे म्हटले आहे. 'पाकिस्तान स्वतःच्या निवडीच्या वेळी आणि ठिकाणी त्याचे उत्तर देईल. ते अनुत्तरीत राहणार नाही. भारताच्या तात्पुरत्या आनंदाची जागा सततच्या दुःखाने घेतली जाईल,' असे त्यात म्हटले आहे.

भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांना लक्ष्य करून ऑपरेशन सिंदूर सुरू केल्यानंतर काही तासांतच सीमेपलीकडून गोळीबार झाला. या गोळीबारमध्ये तीन भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला.

**सिंदूरच्या कारवाईपूर्वी १५ दिवसांत काय घडले?**

२२ एप्रिल २०२५: पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला- जम्मू-काश्मीरमधील पहलगाममधील बैसरन व्हॅलीमध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला आणि अनेकांचा जीव घेतला. हल्लेखोरांनी पर्यटकांना धार्मिक ओळख विचारून गोळीबार केला, ज्यामध्ये २६ जण ठार झाले तर १७ जखमी झाले. भारताने या हल्ल्यासाठी ताबडतोब पाकिस्तानला जबाबदार धरले आणि पाकिस्तानी दहशतवादी गट द रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) आणि लष्कर-ए-तैयबा (एलईटी) यांच्यावर भ्याड हल्ला करण्याचा आरोप केला.

२३ एप्रिल २०२५: भारताचा जलद प्रतिसाद- राष्ट्रीय तपास संस्थेने (छ्ख) तपास सुरू केला आणि गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, छ्ख ने पहलगाम हल्ल्याचा तपास हाती घेतला. हल्ल्याचा कट उलगडण्यासाठी एनआयए पथके बैसरन खोऱ्यात तैनात करण्यात आली आणि त्यांनी तपास सुरू केला.

सिंधू पाणी करार निलंबित- पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुरक्षा मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत १९६० चा सिंधू पाणी करार अनिश्चित काळासाठी स्थगित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला गेला. परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, पाकिस्तान सीमापार दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही तोपर्यंत ही स्थगिती कायम राहील. भारताने पहिल्यांदाच हा करार रद्द केला, ज्याला पाकिस्तानने 'लीं ष थरी' म्हणून वर्णन केले.

अटारी-वाघा सीमा बंद- भारताने पंजाबमधील अटारी-वाघा सीमा तपासणी नाका बंद केला, ज्यामुळे दोन्ही देशांमधील व्यापार आणि हालचाल पूर्णपणे ठप्प झाली.

पाकिस्तानी नागरिकांवर कारवाई- भारताने पाकिस्तानी नागरिकांचे सर्व व्हिसा (सार्क, वैद्यकीय, इ.) तात्काळ प्रभावाने रद्द केले आणि पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत भारत सोडण्याचे आदेश दिले गेले, ज्याला पुढील आदेशापर्यंत वाढीव मुदत दिली गेली.

राजनैतिक पाऊल- भारताने इस्लामाबादमधील भारतीय मिशन आणि नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायोगातील कर्मचाऱ्यांची संख्या ५५ वरून ३० पर्यंत कमी केली. पाकिस्तान उच्चायोगातील संरक्षण, नौदल आणि हवाई दल सल्लागारांना 'पर्सोना नॉन ग्राटा' घोषित करण्यात आले आणि एका आठवड्यात भारत सोडण्याचे आदेश दिले गेले.

२४-२७ एप्रिल २०२५: वाढता तणाव आणि राजनैतिक हालचाली- सिंधू जल संधी कराराला स्थगिती दिल्याच्या प्रत्युत्तरात पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन केले गेले. पाकिस्तानी सैन्याने बारामुल्ला, कुपवाडा, पूंछ आणि अखनूर सारख्या भागात नियंत्रण रेषेवर सतत गोळीबार सुरू केला, ज्याला भारताने शस्त्रसंधीचे उल्लंघन म्हटले. भारतीय लष्कराने याला जोरदार प्रत्युत्तर दिले जात आहे.

पर्यटन स्थळांवरील निर्बंध- जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षेच्या कारणास्तव ४८ पर्यटन स्थळे बंद करण्यात आली तर, बैसरण खोऱ्यात सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करण्यात आली.

२८-३० एप्रिल २०२५: भारताची कडक भूमिका- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरक्षा आढावा बैठकीत सशस्त्र दलांना 'पूर्ण ऑपरेशनल स्वातंत्र्य' दिले आणि हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याची वेळ, लक्ष्य आणि पद्धत ठरवण्याचे अधिकार सैन्यावर सोपवले.

ॲक्शन टास्क फोर्समध्ये कारवाई- भारताने पाकिस्तानला फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स (ऋढऋ) मध्ये पुन्हा 'ग्रे लिस्ट'मध्ये टाकण्याची प्रक्रिया सुरू केली. तांत्रिक गुप्तचर सूत्रांच्या माध्यमातून भारताने पहलगाम हल्ल्यात टीआरएफ आणि लष्कर-ए-तैयबाची भूमिका दर्शविणारे पुरावे सादर केले. अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स सारख्या २० हून अधिक ऋढऋ सदस्य देशांनी भारताला पाठिंबा दिला.

१ मे २०२५: भारतीय हवाई क्षेत्र बंद- भारताने पाकिस्तानी विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र पूर्णपणे बंद केले. यासोबतच पाकिस्तानहून येणाऱ्या सर्व टपाल आणि पार्सल सेवा (हवाई आणि जमीन) तात्काळ बंद करण्यात आल्या

२-६ मे २०२५: जागतिक मध्यस्थी आणि तणाव- अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी भारत-पाकिस्तानच्या नेत्यांशी संवाद साधला आणि दोन्ही बाजूंना तणाव कमी करण्याचे आवाहन केले.

७ मे २०२५: ऑपरेशन सिंदूर-'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारताने झेघ मधील मुरीदके, कोटली, मुझफ्फराबाद आणि बहावलपूर अशा नऊ दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर अचूक लष्करी हल्ले केले. यामध्ये लष्कर-ए-तैयबा आणि ढठऋ च्या दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यात आले.

भारताच्या एअर स्ट्राईकनंतर अमेरिकेने काय म्हटले?

भारतानं जम्मू काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून घेतला आहे. यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पाकिस्तानमध्ये भारताचे एअरस्ट्राईक इट इज शेम अशी प्रतिक्रिया ट्रम्प यांनी दिली आहे. दोन्ही देशांनी तणाव कमी करावा, असा आग्रह त्यांनी केला आहे. ऑपरेशन सिंदूर बाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नावर डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की मी याबाबत ऐकलेय, इट इज शेम, अपेक्षा आहे की हे लवकर समाप्त होईल. कोणत्याही दोन बलवान देशांना युद्धाच्या मार्गावर जाताना पाहू शकत नाही. या दोन्ही देशांचा इतिहास जुना असून तणाव वाढलेला आहे. मात्र, जगाला युद्ध नकोय शांतता पाहिजे, असं ट्रम्प म्हणाले. हे लवकर संपेल अशी आशा बाळगतोय, असं ट्रम्प म्हणाले.

भारताच्या एअर स्ट्राईकनंतर चीनची प्रतिक्रिया-

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सुरू असलेल्या परिस्थितीबाबत प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने बुधवारी सांगितले की, भारताची आज सकाळी झालेली लष्करी कारवाई दुर्दैवी आहे. सद्यस्थितीबाबत आम्ही चिंतेत आहोत. भारत आणि पाकिस्तान हे एकमेकांचे शेजारी देश आहेत आणि चीनचेही शेजारी आहेत. चीन सर्व प्रकारच्या दहशतवादाचा विरोध करतो. दोन्ही देशांनी शांतता आणि स्थैर्याच्या दृष्टीने विचार करावा, संयम बाळगावा, शांतता राखावी आणि परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होईल असे कोणतेही पाऊल उचलू नये, असे आम्ही दोघांनाही आवाहन करतो, असं चीनने म्हटलं आहे.

## हिंदूसूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या जन्मोत्सवानिमित्त भरगच्च कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी -** हिंदूसूर्य वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार दि. ९ मे रोजी शहरात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराणा



प्रतापसिंह जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष खुशालसिंह ठाकुर व सकल राजपूत क्षत्रिय समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

शुक्रवारी सकाळी ९ वाजता मस्तगड येथील मंमादेवी चौकातील महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करण्यात येणार असून, यावेळी पोलीस बँडपथक मानवंदना देणार आहे. त्यानंतर ध्वजारोहण होऊन भव्य रक्तदान शिबिराला सुरुवात होईल. सायंकाळी ५ वाजता याच ठिकाणी मल्लखांबचे थरारक प्रात्यक्षिके, शिवकालीन शस्त्रास्त्रांची प्रदर्शनी , स्वसंरक्षणासाठी महिलांना कराटे प्रशिक्षण होईल. ७ वाजता श्री मंमादेवीची आरती होईल. त्यानंतर सोलापूर येथील प्रसिद्ध डीजेचा निनाद होईल. ८ वाजता जयंतीनिमित्त आयोजित मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्याहस्ते होईल. यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. ९ वाजता या ठिकाणी भव्य आतषबाजी केली जाणार आहे.

याप्रसंगी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष खुशालसिंह ठाकुर, सचिव प्रा. डॉ. भगवानसिंह डोभाळ, उपाध्यक्ष राजेंद्रसिंह ठाकुर, बजरंगसिंह राजपूत, लखनसिंह ठाकुर, शक्तीसिंह राजपूत, नागेश बेनिवाल, देवेंद्रसिंह बुंदेले, विक्रमसिंह काबरे, राजासिंह राजपूत यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

## नदीपात्रात पोहायला गेलेल्या दोन चिमुकल्यांचा बुडून मृत्यू

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** पूर्णा नदीपात्रामध्ये पोहायला गेलेल्या दोन मुलांचा पाण्यात बुडून मंगळवारी (ता. सहा) बुडून मृत्यू झाला. निमखेडा बुद्रुक येथील उमेश दादाराव कासारे (वय दहा वर्ष) व प्रेम ज्ञानेश्वर घोरपडे ( वय आठ वर्ष) ही मुले मृत पावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, जाफराबाद तालुक्यातील निमखेडा बुद्रुक येथील पाच मुले पूर्णा नदीपात्रात पोहण्यासाठी गेले होते. सद्यस्थितीत पूर्णा नदी पात्रात बँक वॉटर चे पाणी आहे. दरम्यान या पाण्यामधून मोठ्या प्रमाणावर वाळूचा उपसा होत असल्याने पात्रामध्ये ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. बोटीद्वारे वाळू उपसा झाल्याने या खड्ड्याचा अंदाज येत नाही दरम्यान ही पाच मुले पोहण्यासाठी गेले होते. यातील वरील दोन चिमुकले पोहोत असताना अचानक खोल खड्ड्यात पडले. ते बुडत असताना इतर तीन मुलांनी आरडाओरडा केला. परिसरातील काही नागरिकांनी धावा धाव करून मुलांना बाहेर काढले. त्यांना जाफराबाद येथे खाजगी रुग्णालयात दाखल केले असता संबंधित डॉक्टरांनी मृत घोषित केले. दोन्ही मुलावर शोकाकुल वातावरणात निमखेडा येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

**अवैध वाळू उपसा आणखी किती बळी घेणार ?**

जाफराबाद तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अवैद्यरित्या वाळू उपसा केला जातो मंगळवारी घडलेल्या घटनेत वाळू उपसा केलेल्या पात्रात मोठमोठे खड्डे असल्याने मुलांना पाण्याचा अंदाज आला नाही. नदीपात्रात अल्प पाणी आहे या अपेक्षेने ते पोहोत असतानाच अचानक खड्ड्यात पडले यामुळे वाळू उपसा करणारे आणखी किती बळी घेणार याची चर्चा होत आहे.


प्रेम घोरपडे


उमेश कासारे

## सैन्यदलांची ताकद, राजकीय इच्छाशक्ती अन् एकता म्हणजे 'ऑपरेशन सिंदूर' - आ. लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** भारतानं दहशतवादाविरुद्ध कणखर भूमिका घेत पहलगाममधील हल्ल्याला चोख प्रत्युत्तर म्हणून आज पहाटे 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले करून ते नष्ट केल्याबद्दल मी भारतीय वायुसेना, नौसेना, थलसेनेच्या नेतृत्वाचं आणि 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी झालेल्या सैनिकांचं मनापासून अभिनंदन करतो. भारतीय सैनिकांच्या क्षमतेवर देशाला पूर्ण विश्वास असून संपूर्ण देश एकजुटीनं त्यांच्यामागे उभा असल्याची प्रतिक्रीया माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी दिली.

आ. लोणीकर म्हणाले की, पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद आता सहन केला जाणार नाही, हे 'ऑपरेशन सिंदूर'नं पुन्हा सिद्ध केलं आहे. पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा बळी गेला होता. या हल्ल्यानं संपूर्ण देश संतप्त होता. या हल्ल्याची जबाबदारी लश्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनांनी घेतली होती. याला प्रत्युत्तर म्हणून भारतानं आज भल्या पहाटे 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून नियोजनबद्ध, अचूक हल्ले करत दहशतवाद्यांचं कंबरडं मोडलं. या कारवाईत नऊ दहशतवादी तळ नष्ट करण्यात आल्याची माहिती आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद संपूर्ण संपेपर्यंत अशाच पद्धतीनं कारवाई होत राहील, हा संदेश देण्यात आपण यशस्वी ठरलो आहोत. देशाच्या सीमेपलिकडे जाऊन लष्करी कारवाई करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती महत्वाची असते. प्रधानमंत्री मा.श्री. नरेंद्र मोदी साहेबांच्या साहसी, कणखर नेतृत्वानं ती नेहमीच इच्छाशक्ती दाखवली आहे. भारतीय सैन्यदलांना संपूर्ण स्वातंत्र्य, मोकळीक, ताकद देत त्यांच्यामागे भक्कमपणे उभं राहिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांचे देखील आ. लोणीकर यांनी अभिनंदन केले.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.